जा.क्र. 676/2020
धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
दिनांक - 10 FEB 2020

**परिपत्रक क्र. 576 दिनांक 10/02/2020**

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून विविध विषयांबाबत संकलित माहितीकरीता विभागीय कार्यालयांकडे पत्रव्यवहार केला जातो. सदर पत्रव्यवहार करताना विभागीय कार्यालयाने त्यांचे अधिनस्त जिल्हा कार्यालयांची संकलित माहिती विभागीय कार्यालयामार्फतच (ध.स.आ.कार्यालय) सादर करावी असे वेळोवेळी कळविण्यात आले आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, मुख्यालयाकडून मागविण्यात आलेली माहिती विभागीय कार्यालयाकडून संकलित करुन न पाठवता जिल्हा कार्यालयामार्फत परस्पर पाठविली जाते. विभागीय कार्यालयामार्फत संकलित माहिती न आल्याने कार्यालयीन कामकाजात विलंब होतो.

या परिपत्रकाद्वारे सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून मागविण्यात येणारी माहिती आपले अधिनस्त जिल्हा कार्यालयांकडून संकलित करुन एकत्रित माहिती आपलेमार्फतच मुख्यालयास पाठविण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही न केल्यास संबंधित अधिकारी व अधिक्षक यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

Rajani

(रा.न.जोशी)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

१. परिपत्रक धारिणी
२. सर्व धर्मादाय सह आयुक्त
३. सर्व धर्मादाय उप आयुक्त
४. सर्व सहायक धर्मादाय आयुक्त
५. सर्व अधिक्षक/जनसंपर्क अधिकारी
६. संगणक शाखा, मुख्यालय (प्रत वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी)

D:\SWATI\Circulars\Marathi Circular 2.docx